महाराष्ट्र शासन
"दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान"
नगरपरिषद प्रशासन संचालनालय
शासकीय परिवहन सेवा इमारत, तिसरा मजला, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०३०.
दुरध्वनी क्र.022 24946880 ,Email: nulmamaharashtra@gmail.com, smid.nulm@gmail.com

क्रमांक : DAYNULM/SMID/AAP2.1/D11/2021-22/ 2085 दिनांक : 25 JUN 2021

प्रति,

शहर प्रकल्प अधिकारी
शहर अभियान व्यवस्थापन कक्ष
दी.अ.यो. राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान
सर्व महानगरपालिका व नगरपरिषद

विषय : स्वयंसहाय्यता बचतगट स्थापनेच्या उद्दिष्टांबाबत .
संदर्भ :

- क्र. नपा/३७२/२०२१ दि. २३/०६/२०२१ नुसार रहिमतपूर यांचे पत्र
- क्र. दि.अ.यो.रा.ना.उ.अ./९६/२०२१ दि. १७/०६/२०२१ नुसार चंद्रपूर यांचे पत्र
- क्र. २०२१/रा.ना.उ.अअभियान कावि ३९७ दि. १४/०६/२०२१ नुसार अक्कलकोट यांचे पत्र
- क्र. कावि/नपदे/दि.अ.यो.रा.ना.उ.अ./२८/२०२१ दि. २३/०६/२०२१ नुसार देसाईगंज यांचे पत्र
- क्र. २०२१-२२/१३ माविम पुणे यांचे मनपा पुणे यांनी पाठविलेले पत्र दि.२४/०६/२०२१

महोदया / महोदय,

उपरोक्त संदर्भीय प्राप्त पत्रानुसार दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत सामाजिक अभिसरण व संस्था विकास या घटकामध्ये स्थापन करण्यात येणाऱ्या स्वयंसहाय्यता बचत गटांचे उद्दिष्ट कमी करणे बाबत विनंती केली आहे. राज्य अभियान व्यवस्थापन कक्षाने दिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या उद्देशाने खालील सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१. SECC यादीच्या आधारे कुटुंब संख्या लक्षात घेऊन गटांतर्गत आलेले लाभार्थी वगळून उर्वरित लाभार्थ्यांच्या आधारे गट स्थापनेचे लक्ष निश्चित करण्यात यावे.
२. अभियानांतर्गत फक्त ३ % गट हे पुरुषांचे स्थापन करण्यात आलेले आहेत. हि संख्या खूपच कमी आहे, त्यामुळे शहर अभियान व्यवस्थापन कक्षाने अति जोखमीचे काम करणाऱ्या पुरुषांचे गट तयार करण्यावर लक्ष केंद्रित करावे.
३. SJSRY अंतर्गत गटांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याचे ULB कडून सांगण्यात येते. यावर जे गट कार्यरत आहेत त्या सर्वांची माहिती NULM MIS पोर्टल वर भरण्यात यावी. जे गट कार्यरत नाहीत / बंद पडलेले किंवा विस्कळीत आहेत अशा गटांच्या महिलांना (ज्यांची नावे SECC अंतर्गत आहेत अशा) शासन निर्णय क्रमांक एनयुएलएम-२०१७/प्र.क्र.१७/नवि-२०, मंत्रालय मुंबई दिनांक ०८ जुन २०१७ नुसार कार्यवाही करून गटामध्ये घेण्यात यावे.

४. अभियान मार्गदर्शक सूचनांनुसार किमान ३% दिव्यांग लाभार्थी असणे आवश्यक आहे. सध्या एकूण स्थापन गटसंख्या पाहता हे प्रमाण फक्त १.३३% आहे. त्यामुळे दिव्यांग व्यक्तींचे गट स्थापन करणे बाबत आपल्या महानगरपालिका व नगरपरिषदेमधील दिव्यांगांची यादी उपलब्ध करून घ्यावी. सदर यादीच्या आधारे लक्ष निश्चित करून गटांची बांधणी करावी.
५. एका कुटुंबामध्ये एका व्यक्ती पेक्षा जास्त व्यक्ती गटामध्ये येण्यासाठी इच्छुक असल्यास सदर कुटुंबामधील एकापेक्षा जास्त व्यक्तींना वेगवेगळ्या गटांमध्ये घेता येईल.

वरील सूचनांची अंमलबजवणी करून शहर अभियान व्यवस्थापन कक्षाने आपल्या ULB अंतर्गत स्वयंसहाय्यता बचतगट स्थापनेचे उद्दिष्ट निश्चित करावे, तसेच ULB ला देण्यात आलेल्या वर्ष 2021-22 च्या उद्दिष्टांमध्ये कुठलाही बदल प्रस्तावित न करता दिलेले उद्दिष्ट हे अंतिम उद्दिष्ट म्हणून समजण्यात यावे.

Bhosale

(डॉ. दिपाली भोसले)
उपसंचालक(प्र)
दी.अ.यो.राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान,
नगरपरीषद प्रशासन संचालनालय,मुंबई.

प्रत :
जिल्हा प्रशासन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सर्व जिल्ह्ये.

सोबत : शासन निर्णय क्रमांक एनयुएलएम-२०१७/प्र.क्र.१७/नवि-२०, मंत्रालय मुंबई दिनांक ०८ जुन २०१७